नियमित दिवाणी मुकदमा क्र. २४ सन २०१९
निशाणी ३३ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दाव्याच्या सरनाम्यामध्ये प्रतिवादी नं.१३ चे नांव ' श्री. ज्ञानदेव एकनाथ वायंगणकर ' असे लिहिले गेले आहे. परंतु, प्रतिवादी नं. १३ चे नांव 'ज्ञानदेव' नसुन 'सुहास ' असे आहे. सदरची दुरुस्ती दाव्यात होणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी नं.१३ च्या नांवामधील 'ज्ञानदेव' या शब्दावर काट मारुन त्याऐवजी 'सुहास' असे लिहिण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. प्रतिवादीने सदर अर्जास सक्त विरोध दर्शविला आहे.

३. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दोन्ही पक्षामधील खराखुरा वाद अंतिमतः निर्णित करण्यासाठी न्यायालयास, प्रदान केलेल्या विवेकाधिकारानुसार कोणत्याही वेळी आणि त्यास योग्य वाटेल अशा दावा खर्चविषयक अटीवर किंवा अन्यथा, दाव्यातील कोणत्याही कार्यवाहीमधील कोणताही दोष किंवा चुक सुधारता येईल. वादपत्रामध्ये दुरुस्तीस परवानगी देत असताना दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होणार नाही, तसेच प्रस्तावित दुरुस्ती विरुध्द पक्षास त्रासदायक होणार नाही याची दक्षता न्यायालयाने घेणे आवश्यक असते. थोडक्यात दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल न करणारी व खराखुरा वाद निर्णित करण्यासाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीस परवानगी देणे न्यायसंगत होते.

४. वादीने सदरचा दावा हा हक्कप्रस्थापना होवून प्रतिवादींना कायम ताकीद होण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १३ हे दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. प्रतिवादी नं. १३ यांस दाव्याचे समन्स उचित रित्या बजावणी करुन त्याला त्याचे म्हणणे सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. परंतु त्याचे नांव चुकीचे नमुद झाले असल्याने त्यास दाव्याचे समन्स बजावणी करणे अडचणीचे आहे. प्रतिवादीच्या नांवामध्ये झालेली चुक ही नजरचुकीने व टंकलेखनाने टंकलिखित झालेली आहे असे दिसते. सदरची चुक ही तांत्रिक स्वरुपाची आहे. त्यामुळे ती दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपावर कोणताही परिणाम होणार नाही. तथापी दावा

दाखल करण्यापुर्वी वादीने पक्षकारांच्या नांवाची खात्री न करता चुकीच्या नांवाने दावा दाखल केला आहे. वादीच्या चुकीमुळे न्यायालयाचा बहुमुल्य वेळ वाया गेला आहे. सबब त्याचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे न्यायसंगत होणार आहे या निष्कर्षापर्यंत मी पोहोचलो आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीवर रक्कम रुपये १००/– इतका खर्च आकारुन अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने खर्चाची रक्कम सरकारजमा करावी.

३. वादीला असे आदेशीत करण्यात येते की, त्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १८ मध्ये दिलेल्या तरतुदीस अधीन राहून वादपत्रामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करावी.

४. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Sadanand Baburao Patil
Digitally signed by Sadanand Baburao Patil
Date: 2020.08.11 16:03:48 +0530

दिनांक :– ११/०८/२०२०

(एस्. बी. पाटील ),
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कुडाळ.